वन परिक्षेत्र अधिकारी यांना शासन सेवेत
पुन:स्थापित करुन पदस्थापना देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन आदेश क्रमांक:- एफएसटी-०२/१९/प्र.क्र.५२/फ-४

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ८ मार्च, २०१९.

वाचा:- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र

१. कक्ष-१०(१)/आस्था/एक/प्र.क्र.१०३(१८-१९)/२९३, दि. ६.११.२०१८
२. कक्ष-१०(१)/आस्था/एक/प्र.क्र.१०२(१८-१९)/३७१, दि. २९.१.२०१९
३. कक्ष-१०(१)/आस्था/एक/प्र.क्र.१०२(१८-१९)/३७६, दि. ३०.१.२०१९
४. कक्ष-१०(१)/आस्था/एक/प्र.क्र.१५४(१८-१९)/३८८, दि. ७.२.२०१९
५. कक्ष-१०(१)/आस्था/एक/प्र.क्र.११५(१८-१९)/४११, दि. १३.२.२०१९
६. कक्ष-१०(१)/आस्था/एक/प्र.क्र.१४१(१८-१९)/३८७ व ३८५, दि. ६.२.२०१९

आदेश:-

ज्याअर्थी, पुढील तक्यातील नमूद ६ वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात आले व त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्रे बजावून विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू केली.

अ. क्र.	निलंबित वनपरिक्षेत्र अधिकारी याचे नाव	निलंबन आदेश दिनांक	दोषारोप पत्र बजावल्याचा दिनांक	विभागीय चौकशीचा तपशील
१.	श्री. डी. के. डाखोरे, वन परिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) परभणी, वनविभाग परभणी	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद यांचे आदेश दि. १०.०७.२०१८	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद यांचे दि. १९.१०.२०१८ च्या ज्ञापनान्वये म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ अंतर्गत दोषारोप पत्र बजावण्यात आले आहे.	विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.
२.	श्री. प्रशांत निलकांत हुमणे, वन परिक्षेत्र अधिकारी, विशेष व्याघ्र संरक्षण दल, मुख्यालय कोलीमतारा, पेंच व्याघ्र प्रकल्प	वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांचे आदेश दि.३.८.२०१८	मुख्यवनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांच्या दिनांक २४.०१.२०१९ च्या ज्ञापनान्वये म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ अंतर्गत दोषारोप पत्र बजावण्यात आले आहे.	विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.
३.	श्री. हिम्मत वसंत सापळे, वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), पश्चिम वाडा, वनविभाग जव्हार	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे यांचे आदेश दि. १४.०९.२०१८	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे यांचे दि. १३.१२.२०१८ च्या ज्ञापनान्वये म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ अंतर्गत दोषारोप पत्र बजावण्यात आले आहे.	विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

अ. क्र.	निलंबित वनपरिक्षेत्र अधिकारी याचे नाव	निलंबन आदेश दिनांक	दोषारोप पत्र बजावल्याचा दिनांक	विभागीय चौकशीचा तपशील
४.	श्री. व्ही. एन. मिसाळ, वनपरिक्षेत्र अधिकारी, सामाजिक वनीकरण वसमत, सा.व.वि. हिंगोली	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद यांचे आदेश दि. ३०.०६.२०१८	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद यांचे दि. ०५.११.२०१८ च्या ज्ञापनान्वये म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम १० अंतर्गत दोषारोप पत्र बजावण्यात आले आहे.	विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.
५.	श्री. बी. बी. मारबते, वन परिक्षेत्र अधिकारी उत्तर देवरी, गोंदिया वनविभाग	उपवनसंरक्षक,गोंदिया वनविभाग, गोंदिया यांचे आदेश दि. २८.९.२०१८	श्री. मारबते व श्री. काशीकर यांनी निलंबन आदेशाविरुध्द मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ नागपूर येथे अनुक्रमे मुळ अर्ज क्र. ७९८/२०१८ व ७९९/२०१८ दाखल केले होते. सदर दोन्ही प्रकरणी मा. न्यायाधिकरणाने मा. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल क्र. ३५/२०१८ व ९१८/२०१८ अजय कुमार चौधरी विरुध्द केंद्र शासन या प्रकरणाचा आधार घेऊन दि. ७.१.२०१९ च्या आदेशान्वये श्री. मारबते व श्री. काशीकर यांना तीन आठवडयाच्या आत शासन सेवेत पुन:स्थापित करण्याचे आदेश दिले होते. गोंदिया जिल्हयात रोजगार हमी योजने अंतर्गतच्या कामासंदर्भात झालेल्या अनियमिततेबाबत चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्त, नागपूर यांनी जिल्हास्तरीय चौकशी समिती दि. १८.९.२०१८ रोजी गठीत केली असून समितीचा अहवाल प्रतिक्षित आहे.	
६.	श्री. ए. ए. काशीकर, वन परिक्षेत्र अधिकारी, चिचगड, गोंदिया वनविभाग	उपवनसंरक्षक,गोंदिया वनविभाग, गोंदिया यांचे आदेश दि. २८.९.२०१८		

२. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १४.१०.२०११ च्या शासन निर्णयातील परि.७(अ) नुसार ज्याप्रकरणी केवळ म.ना.से. (शिस्त व अपील) नियम,१९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावित अथवा सुरु असल्याच्या कारणाने त्यांना निलंबित करण्यात आले असेल अशा प्रकरणी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांनी निलंबनाच्या तारखेपासून ३ महिन्यांनी निलंबनाचा आढावा घ्यावयाचा आहे. परि.७ (ब) नुसार निलंबित शासकीय / कर्मचारी यांच्या विरुध्द नियम १० खाली चौकशी करावयाचा निर्णय होईल अशा प्रकरणी त्या निर्णयासोबतच निलंबन संपुष्टात आणून अकार्यकारी पदावर नियुक्ती देण्याबाबतचा उचित निर्णय देखील संबंधित शिस्तभंग विषयक प्राधिकारी यांच्या स्तरावर घेण्यात यावा. सदर तरतूद विचारात घेता वरील तक्त्यातील अ.क्र. १ ते ४ येथील नमूद वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना त्यांच्याविरुध्द सुरु असलेल्या विभागीय चौकशीच्या अधीन राहून त्यांना सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२०.०४.२०१३ च्या नियमानुसार शासन सेवेत अकार्यकारी पदावर पुन:स्थापना करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

३. त्याअर्थी, आता शासन महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ४(५)(क) अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन या आदेशानुसार पुढील तक्यात अ.क्र. १ ते ४ येथील नमूद वनपरिक्षेत्र

अधिकाऱ्यांना शासन सेवेत पुन:स्थापित करुन पदस्थापना व अ.क्र. ५ व ६ येथील नमूद वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांची पदस्थापना पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे:-

अ. क्र.	निलंबित वनपरिक्षेत्र अधिकारी याचे नाव व कार्यरत ठिकाण	कार्यरत महसूली विभाग	पुन:स्थापनेनंतरचा महसूली विभाग	पदस्थापना
१.	श्री. डी. के. डाखोरे, वन परिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) परभणी, वनविभाग परभणी	औरंगाबाद	नागपूर	वनपरिक्षेत्र अधिकारी, मेकॅनिकल लॉगींग युनिट, सिरोंचा, गडचिरोली वनवृत्त
२.	श्री. प्रशांत निलकांत हुमणे, वन परिक्षेत्र अधिकारी, विशेष व्याघ्र संरक्षण दल, मुख्यालय कोलीमतारा, पेंच व्याघ्र प्रकल्प	नागपूर	नाशिक	वनपरिक्षेत्र अधिकारी, नंदुरबार रोहयो, नंदुरबार
३.	श्री. हिम्मत वसंत सापळे, वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), पश्चिम वाडा, वनविभाग जव्हार	कोकण-२	नाशिक	वनपरिक्षेत्र अधिकारी, पिंपळनेर (प.घा.वि.), वनविभाग धुळे
४	श्री. व्ही. एन. मिसाळ, वनपरिक्षेत्र अधिकारी, सामाजिक वनीकरण वसमत, सा.व.वि. हिंगोली	औरंगाबाद	नागपूर	वनपरिक्षेत्र अधिकारी, सिरोंचा (रोहयो), वनविभाग सिरोंचा, गडचिरोली
५.	श्री. बी. बी. मारबते, वन परिक्षेत्र अधिकारी उत्तर देवरी, गोंदिया वनविभाग	नागपूर	पुणे	वनपरिक्षेत्र अधिकारी, कार्य आयोजना, कोल्हापूर
६.	श्री. ए. ए. काशीकर, वन परिक्षेत्र अधिकारी, चिचगड, गोंदिया वनविभाग	नागपूर	औरंगाबाद	वनपरिक्षेत्र अधिकारी, भ. व का. जिंतुर, वनविभाग परभणी

उक्त वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेविरुध्द सुरु असलेली विभागीय चौकशीची कार्यवाही त्यांच्या पुन:स्थापनेनंतरही चालू राहील तसेच नियुक्तीच्या ठिकाणी या आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत रुजू व्हावे. उक्त कालावधीत ज्या दिवशी संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी प्रत्यक्ष रुजू होतील त्या तारखेपासून त्यांचे निलंबन प्रत्यक्षात समाप्त होईल.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१११७४४१७०९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Babasaheb S. Shinde

Digitally signed by Babasaheb S. Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1706e7b903eb05a5f1c405f3795499452af658b876e10b223a0cef893b6b6689, cn=Babasaheb S. Shinde
Date: 2019.03.11 17:47:36 +05'30'

(बा. सि. शिंदे)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति:-

१) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य १/२ मुंबई/नागपूर.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य नागपूर.
३) मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे
५) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), औरंगाबाद
६) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नागपूर
७) वनपरिक्षेत्र अधिकारी (निलंबीत) यांना अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य नागपूर यांचेमार्फत.
८) निवड नस्ती फ-४ कार्यासन, मंत्रालय, मुंबई.